# विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात रमले विदेशी शास्त्रज्ञ

**तभा वृत्तसेवा**
**अमरावती, १९ नोव्हेंबर**



विद्यापीठाच्या निसर्गरम्य वातावरणात रमून गेलेले विदेशी पाहुणे

आंतरराष्ट्रीय स्पायडर परिषदेसाठी अमरावतीला आलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त शास्त्रज्ञांनी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसराची पाहणी केली आणि हे विदेशी पाहुणे आल्हाददायक वातावरणात रमून गेले.

सुरुवातीला कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांनी विद्यापीठ अतिथीगृहात या विदेशी पाहुण्यांशी चर्चा केली. चर्चेदरम्यान विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभाग, विकासात्मक कार्यक्रम, संशोधन, विद्यार्थ्यांकरिता असलेल्या विविध सुविधा, अभ्यासक्रम, तद्वतच विद्यापीठाद्वारे राबविल्या जात असलेले विविध उपक्रम आदींची माहिती कुलगुरूंनी यावेळी दिली. यावेळी विदेशातील इजिप्तच्या कैरव येथील हिशांत हेनावे, रशिया येथील डॉ. युरी मारूसिक, नेदरलँड येथील पीटर कुमन, सिंगापूर येथील जोसेफ के.एच. कोह, जपान येथील डॉ. हिरोत्सुगु वन, जर्मनी येथील डॉ. पिटर जॉगर आदी शास्त्रज्ञांसह अनेक शास्त्रज्ञ उपस्थित होते. त्यानंतर पाहुण्यांनी विद्यापीठाच्या परिसराची पाहणी केली. निसर्गरम्य परिसर, स्वच्छता, विविध प्रकारची वृक्षवल्ली, सुंदर रस्ते, उद्याने, क्रीडांगणे आणि परिसरातील जलबंधाऱ्यांची पाहणी केली. विद्यापीठाचा निसर्गरम्य सुंदर परिसर, स्वच्छता, विकास कामे, प्रदुषणमुक्त आणि एकसंध परिसराबद्दल विदेशातील पाहुण्यांनी कौतुकाचा वर्षाव केला. यावेळी कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी प्रशासकीय प्रणालीबाबत पाहुण्यांना माहिती दिली.

सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत कुलगुरू डॉ. मोहन खेडकर व कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले. यावेळी परीक्षा नियंत्रक डॉ. जे.डी. वडते, वित्त व लेखाधिकारी डॉ. शशिकांत आस्वले, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. मोहन खेरडे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. गणेश मालटे, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव प्रवीण राठोड याशिवाय प्राणीशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. जी.एन. वानखेडे उपस्थित होते.

तरुण भारत दि० 20/11/15